MHKO070001101998

<u>रेग्युलर कज्जा क्रं.१४८/१९९८ मधील निशाणी १३६ वरील आदेश</u>.

१. प्रस्तुत अर्ज वादीने या दाव्याच्या कामी सी.पी.सी. ऑर्डर १८ रुल ३(अ) प्रमाणे दाखल केला आहे.

२. वादीचे कथनानुसार प्रस्तुत दावेत वादी यांनी नि.१२४ ला अर्ज देवून वादी नं.७ यांना साक्षीदार म्हणून तपासण्याची परवानगी मिळाली होती. परंतू वादी नं.७ यांचे वय सध्या ७० असून त्यांना रक्तदाब, शुगर, कंपवात, स्पॉडेलायटीस व विस्मृतीचा त्रास सुरु झाला आहे. त्यामुळे प्रस्तुत कामी त्यांना तपासणे अडचणीच झाले आहे. सबब, वादी यांना वादी नं.७ ऐवजी वादी नं.८ अ श्री. चंद्रकांत आण्णा धुळासांवत यांना वादीतर्फे साक्षीदार म्हणून तपासणेची परवागनी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी तर्फे वादी यांचे अर्जास नि.१४० कडे आपले म्हणणे सादर केले आहे. प्रतिवादी यांचे म्हणणे असे की, वादी यांनी त्यांचेतर्फे विश्वस्त श्री.रावसाहेब सिध्दाप्पा सुर्यवंशी यांचा जबाब नि.४१ ला घेतला असून तो जबाब त्यांनी स्वतःसाठी व सर्व विश्वस्तांकरीता दिलेला आहे. त्यामुळे पुन्हा वादी यांना वादी नं.८अ चंद्रकांत आण्णा धुळासांवत यांचा जबाब घेता येणार नाही. रावसाहेब सिध्दाप्पा याच्या उलटतपासामध्ये त्यांनी काही गोष्टी मान्य केलेल्या आहेत. कायदयातील तरतुदीप्रमाणे पक्षकाराने उलटतपासामध्ये काही ॲडमिशन्स दिल्या असतील तर त्या ॲडमिशन्स वॉश आउट करणेकरीता वादीना दुसरा पक्षकार तपासता येणार नाही. वादी यांनी प्रस्तुत कामी अशाप्रकारचे बरेच अर्ज दिलेले आहेत. तसेच वादी नं.७ याच्या अजारपणाचे जे कारण दिले आहेत त्याबाबतचे कागदोपत्री पुरावा हजर केलेला नाही. वादींनी सदर अर्जाचे कामी दिलेले कारण हे संयुक्तीक नाही. सबब वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज, त्यावरील म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत दाव्यात वादीतर्फे वादी नं.२ यांना नि.नं.१०२ वरील आदेशान्वये वादीतर्फे पुरावा देण्यास परवानगी दिली होती. परंतू वादी नं २ हे दि २१.१२.१७ मयत झाल्याने त्याच्या ऐवजी वादी नं ९ यांना तपासण्याची परवानगी मिळणेबाबत अर्ज नि.१२४ अन्वये अर्ज दिलेला होता व सदरचा अर्ज मंजूर करणेत आला होता. तद्नंतर प्रस्तुत वादी यांनी सदरचा अर्ज दिला आहे. प्रतिवादीतर्फे घेण्यात आलेल्या हरकतीचा विचार करता सदरच्या हरकती या यापूर्वी वादी यांनी दिलेल्या नि.१०२ तसेच नि.१२४ वर सुध्दा घेण्यात आलेल्या होत्या. तदनंतर सदरचे अर्ज हे मंजूर करण्यात आलेले आहेत. प्रस्तुतच्या अर्जान्वये वादी यांनी नि.१२४ मध्ये त्यांनी नमुद केलेल्या साक्षीदारास त्याच्या वैद्यकिय कारणामुळे तपासणे शक्य नसल्याने वादी नं.८ अ यास तपासण्यास परवानगी मागत आहे. वादी यास त्यांची बाजू योग्य पद्धतीने मांडू देण्यासाठी त्यांना आवश्यक असलेल्या साक्षीदार तपासण्यास संधी देणे न्यायोचित्त वाटते. परंतू सदरचा दावा हा सन १९९८ मध्ये दाखल करण्यात आलेला आहे. वादी याने यापूर्वीसुध्दा आशाप्रकारचे अर्ज दिल्याचे दिसुन येत आहे. या सर्व परिस्थतीचा विचार करता वादी यांच्याकडून प्रस्तुत दाव्याचे कामकाम चालविण्यास होत असलेल्या विलंबाचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज हा योग्य त्या दंडावर मंजूर करणे गरजेचे वाटते. सबब, मी खालील आदेश पारित करतो:-

| | <u>आदेश</u> | |
|---|---|---|
| १ | प्रस्तुतचा अर्ज वादीने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण केंद्र, जयसिंगपूर यांचेकडे र.₹५००/- इतका दंड म्हणुन जमा करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो. | |

सही/-

ठिकाण:-जयसिंगपूर.
दिनांक:-१५/०६/२०१९.

(विश्वास पां.शिंदे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
जयसिंगपूर.